विद्या विकास मंडळ

रामकृष्ण महादेव साळगांवकर उच्च माध्यमिक विद्यालय

मडगाव- गोवा

प्रथम सत्र परीक्षा– जुलै २०२५

इयत्ता :बारावी | विषय : मराठी (द्वितीय भाषा) | वेळ : १ तास

दिनांक : २५/७/२०२५ | गुण : २०

सूचना : १. शुध्दलेखनाचे नवीन नियम पाळावेत.

२. उजवीकडील अंक प्रश्नांचे गुण दर्शवितात.

---

## विभाग १- व्याकरण

खालील शब्दांची भाववाचक नामे लिहा .

प्रश्न.1. कोरडे 1

प्रश्न.2. शांत 1

खालील वाक्यातील अधोरेखित शब्दांच्या जाती लिहा..

प्रश्न. 3. एका गेंडयावर त्याने डझनभर बार टाकले. 2

## विभाग २ - गद्य आणि पद्य

खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका ओळीत लिहा.

प्रश्न. 4. ‘ चक्रवाक पक्षी ’या कवितेत जीवनावेगळे कोण तळमळत आहे ? 1

प्रश्न. 5. कवी बोरकरांच्या मते खरा देखणा चेहरा कसा असतो? 1

खालील कवितेच्या ओळी कंसातील योग्य वापरुन पूर्ण करा.

प्रश्न. 6. चक्रवाक पक्षी वियोगे ________ । 1

( बाहती , वाहती , बाहाती )

प्रश्न. 7. ____________ न गाडि ही माता,रे . 1

(सबला, अबला, तबला)

प्रश्न.8. देखणे ते ________ ज्यांना निर्मितीचे डोहळे. 1

( हात, ओठ, डोळे )

खालील वाक्यांचे संदर्भासह स्पष्टीकरण लिहा.

प्रश्न. 9. " अन्न घेऊन आलाश वाटतं तुम्ही! द्या काहीतरी द्या मला ! " 5

किंवा

' निसर्ग हा सर्वत मोठा गुरु आहे.'

विभाग ३- लेखन

खाली दिलेल्या वाक्प्रचारांचा योग्य पर्याय निवडून लिहा.

प्रश्न.10. पोटात शिरणे ________ 1

- पुरेपूर कष्ट करणे
- वश करून घेणे
- खूप भूक लागणे
- यश प्राप्त करणे

प्रश्न. 11. जायबंदी होणे ________ 1

- हल्ला करणे
- त्रास होणे
- आक्रमणासाठी पुढे येणे
- जखमी होणे

खालील उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची योग्य उत्तरे लिहा.

आई थोर तुझे उपकार। जननी जठरी त्यां रक्षियेले त्यां पोसुनी पंचही प्राण, प्रेमस्वरूप आई, वात्सल्य सिंधु आई, अश्या अनेक कविता आईच्या नावावर लिहिल्या गेल्या. प्रत्येकाची आई वेगळी पण प्रेम एकच असते. "आ" म्हणजे आत्मा "ई" म्हणजे ईश्वर यांच मिलन म्हणजे आई. प्रत्येकाला आपली आई महान असते. न शिकलेली, सुंदर, कुरूप, श्रीमंत कशीही असली तरी वात्सल्य एकच असते. आता शब्द बदललेत. आईची मम्मी, मम्मा, अम्मा वैगरे झाल्या. व्यक्ति एकच. जननी, जन्मदात्री, माय, आवय अशी नावें झाली. स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी असे म्हटले जाते. ते खरें आहे. आईची जागा रागवायला, प्रेमाला, सुख-दुःख सांगायला हक्काचं स्थान असतं. माझी आई खूप शिकलेली नव्हती पण वाचणारी होती. त्यामुळे खेड्यात सुद्धा तिला अनेक विषयांचे ज्ञान होते. तिने स्वतः खूप कष्ट केले त्यामुळे कष्टाशिवाय काही मिळत नाही ही शिकवण तिने मला दिली. रिकामे रहायचे नाही. आळसाला दूर ठेवायचे. आहे त्या परिस्थितीत आनंदी उमेदीने रहायचे कोणतीही वस्तू टाकून घ्यायची नाही त्याचाही उपयोग असतो तो कसा करावा हेही ती सांगत होती.

- सय्याछाया

- सौ. कुंदा कृष्ण कर्वे

प्रश्न. 12. 'आई' हा शब्द कसा तयार झाला आहे ? 1

प्रश्न. 13. आईला अजुन काय नाव दिली आहेत ? 1

प्रश्न. 14. आईने कोणती शिकवण दिली ? 1

प्रश्न. 15. उताऱ्याला योग्य शीर्षक द्या 1